# महाराष्ट्र शासन

## शिक्षणाधिकारी (माध्यमिक) कार्यालय, जिल्हा परिषद, धुळे

Email ID - rmsadhule@gmail.com फोन नं. ०२५६२ २३५०७५


**जा.क्र.धुजिप/शिक्षण/माध्य / ३४५ /२०२०** **दिनांक - २० / ०३ / २०२०**

आदेश कोरोना विषाणू (कोव्हिड १९)

प्रति,

मुख्याध्यापक/ प्राचार्य
सर्व व्यवस्थापन, माध्यम माध्यमिक उच्च माध्य. व कनिष्ठ महाविद्यालय, जिल्हा धुळे.

**विषय :-** कोरोना विषाणू (कोव्हिड १९) चा होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत....

**संदर्भ :-** १) मा.प्रधान सचिव, महराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र.करोना २०२०/प्र.क्र.५८/आरोग्य ५ दि.१४ मार्च, २०२० व दि.१६ मार्च, २०२०.
२) सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्र.समय २०२०/प्र.क्र.३५/१८(र.व का.) दि.१८.०३.२०२०.
३) मा.उप सचिव, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र.संकीर्ण-२०२०/प्र.क्र.१०६/एसडी-४ दि.२०/०३/२०२०.
४) मा.जिल्हाधिकारी धुळे यांचे आदेश क्र.ड/कक्ष/३/गृह/पीओएल/कावि/३३०/२०२० दि.२०.३.२०२०.

राज्यात कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून शासनाने राज्यातील शाळा/कनिष्ठ महाविद्यालय दिनांक ३१ मार्च, २०२० पर्यंत बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

राज्यातील शासकीय/खाजगी व्यवस्थापनाच्या अनुदानित/विना अनुदानित/ स्वयं अर्थसहाय्यीत इ.१ ली ते इ.८वीच्या अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांची एप्रिल, २०२० च्या पहिल्या आठवड्यात संकलीत मुल्यमापन चाचणी २ होणे नियोजित होते. तथापि, सद्यस्थितीत दिनांक ३१ मार्च, २०२० पर्यंत शाळा बंद ठेवण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

वरील विषयाबाबत या पत्रासोबत जोडलेल्या संदर्भाधीन पत्राचे व शासन निर्णयाचे अवलोकन करुन आपणांस **सदर पत्रानूसार / शासन निर्णयानूसार पुढीप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.**

अ) राज्यातील शासकीय/खाजगी व्यवस्थापनाच्या अनुदानित / विना अनुदानित/स्वयं अर्थसहाय्यीत **इ.१ली ते इ.८ वी च्या परीक्षा रद्द करण्यात येत असून** सातत्यपूर्ण सर्वकष मुल्यमापन अंतर्गत इ.१ ली ते इ.८ वी च्या विद्यार्थ्यांचे वर्षभर आकारिक व संकलित मुल्यमापन करण्यात येत असते **त्या आधारावर विद्यार्थ्यांना पुढील वर्गात प्रवेश देण्यात यावा.**

**ब)** राज्यातील शासकीय/ खाजगी व्यवस्थापनाच्या अनुदानित/ विना अनुदानित/ स्वयं अर्थसहाय्यीत **इ.९ वी व इ.११ वी ची परीक्षा १५ एप्रिल, २०२० नंतर घेण्यात यावी.**

**क)** राज्यतील शासकीय / खाजगी व्यवस्थापनाच्या अनुदानित/ विना अनुदानित/ स्वयं अर्थ सहाय्यीत **सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना ३१ मार्च, २०२० पर्यंत (एसएससी बोर्ड परीक्षेशी संबंधित कामे वगळून) घरातून कामे करण्याची परवानगी देण्यात येत आहे.**

**ड) एसएससी बोर्ड च्या परीक्षा वेळापत्रकानुसारच घेतल्या जातील. त्यासंदर्भात विभागीय मंडळ द्वारा वेळोवेळी निर्गमित सुचनांनूसार कार्यवाही करावी.**

**त्याचप्रमाणे मा.जिल्हाधिकारी धुळे यांच्या संदर्भ क्र.४ च्या आदेशानूसार धुळे जिल्ह्यातील सर्व शैक्षणिक संस्थांची मैदाने येथे एसएससी बोर्ड परीक्षा काळा व्यतिरीक्त गर्दी होणार नाही याची दक्षता सर्व संबंधितांनी घ्यावी. प्रत्यक्ष परीक्षा कालावधीत विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या गर्दीचे केंद्र संचालक व परीक्षेशी संबंधित घटकांनी योग्यपणे कोरोना प्रतिबंधात्मक व्यवस्थापन करावे. परीक्षा दालनातही कोरोना प्रतिबंधात्मक योग्य ती खबरदारी घ्यावी.**

सोबत – संदर्भिय पत्र

(डॉ.सुभाष बोरसे)
शिक्षणाधिकारी (माध्य.)
जिल्हा परिषद,धुळे.

प्रत माहितीस्तव सविनय सादर –

- मा.आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे.
- मा.शिक्षण संचालक (माध्य.व उच्च माध्य.) शिक्षण संचालनालय, म.रा.पुणे.
- मा.शिक्षण उपसंचालक नाशिक विभाग, नाशिक.
- मा.विभागीय सचिव, नाशिक विभागीय मंडळ, नाशिक.